वर्ष - ५ | अंक - 63 | पाने ४ | किंमत - ४ रुपये | www.Bharatsangram.com | EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE | Bharatsangram@gmail.com | आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र. MAHMAR/2020/79677

दैनिक वाशिम, शनिवार, दि. २१ मार्च २०२६ सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम

रमजान मुबारक

# महिला आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडे सोपवला, अशोक खरात प्रकरण भोवले

भारत संग्राम | प्रतिनिधी

नाशिक : नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाला आता मोठे राजकीय वळण लागले असून, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ आणि त्याच्यासोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत. या गंभीर प्रकारामुळे चाकणकर यांच्यावर चोहोबाजूंनी टीकेची झोड उठली होती. तसेच विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची आग्रही मागणी लावून धरली होती. अखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची



भेट घेऊन चाकणकरांनी राजीनामा दिला असल्याचे समोर आले आहे. तसेच वैयक्तिक कारणाने राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपले पद गमवावे लागले असून, राष्ट्रवादी काँग्रेसने शुक्रवारी सकाळीच त्यांना राजीनामा देण्याच्या सूचना केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार चाकणकर यांनी प्रथम महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, आता त्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. रुपाली चाकणकर यांनी नुकतीच पुणे डीजींची भेट घेतली होती. तसेच सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी जाण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी वर्षा बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर रात्री उशिरा चाकणकर यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली व या भेटीत त्यांनी राजीनामा दिला आहे. पदाचा राजीनामा दिल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी ट्विट करत म्हटले की, आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, आमच्या नेत्या तसेच राज्याच्या सन्माननीय उपमुख्यमंत्री आदरणीय सुनेत्रावाहिनींकडे माझ्याकडे असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा सुपूर्द केला. सध्या विविध माध्यमातून होत असलेल्या आरोपांची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने चौकशी व्हावी म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारत मी हा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत योग्य तो निर्णय आदरणीय सुनेत्रावहिनी घेतील! या प्रकरणाबाबत लवकरच मी सविस्तर भूमिका मांडेल. रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले की, मुख्यमंत्री साहेबांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना राजीनामा देण्याचे आदेश दिल्याचे समजत आहे, याबाबत मुख्यमंत्र्यांचे आभार, परंतु केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही तर या प्रकरणाच्या तळाशी जाऊन पारदर्शक चौकशी करावी आणि आ. अमोल जी मिटकरी म्हणत असल्याप्रमाणे अजितदादांच्या अपघाताशी या भोंदू बाबाचे कनेक्शन आहे का? याचाही तपास व्हायला हवा.

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपले पद गमवावे लागले असून, राष्ट्रवादी काँग्रेसने शुक्रवारी सकाळीच त्यांना राजीनामा देण्याच्या सूचना केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार चाकणकर यांनी प्रथम महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, आता त्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. रुपाली चाकणकर यांनी नुकतीच पुणे डीजींची भेट घेतली होती. तसेच सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी जाण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी वर्षा बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर रात्री उशिरा चाकणकर यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली व या भेटीत त्यांनी राजीनामा दिला आहे. पदाचा राजीनामा दिल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी ट्विट करत म्हटले की, आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, आमच्या नेत्या तसेच राज्याच्या सन्माननीय उपमुख्यमंत्री आदरणीय सुनेत्रावाहिनींकडे माझ्याकडे असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा सुपूर्द केला.

# इराणच्या हल्ल्याचा धसका, आखातामधील 'या' देशाकडून अमेरिकेला नो एन्ट्री

भारत संग्राम | प्रतिनिधी

**तेहरान** : अमेरिका-इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध सुरू करून २१ दिवस झाले. इस्त्रायल-अमेरिकेच्या हल्ल्याला इराणने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. इराणने आखाती देशांमध्ये असलेल्या अमेरिकेच्या लष्करी तळांवर जोरदार हल्ले केले.

अमेरिकेचे रडार, लष्करी तळांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. अमेरिकेच्या तळांमुळे आपल्या देशात इराणच्या मिसाईल येत असल्यानं आखाती देशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. अशातच आता इराणच्या धास्तीने आखातात मोठी घडामोड झाली आहे. मध्यपूर्वेतील परिस्थिती दिवसेंदिवस स्फोटक होत चालली आहे. इराकने आपल्या भूमीवर अमेरिकेला लष्करी तळ (Military Base) देण्यास स्पष्ट नकार दिला आहे, तर दुसरीकडे इराणने ब्रिटनला थेट परिणामांचा



इशारा देत युद्धाची ठिणगी टाकली आहे. इराकचे पंतप्रधान मोहम्मद शिया अल-सुदानी यांनी ब्रिटनच्या पंतप्रधानांशी चर्चा करताना ठामपणे सांगितले की, अमेरिकन सैन्याला इराकचे लष्करी तळ वापरू देणे हे देशाच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन ठरेल. "आमच्या देशाच्या सुरक्षेची जबाबदारी इराकी सैन्य स्वतः सांभाळण्यास समर्थ आहे, त्यामुळे परदेशी सैन्याच्या उपस्थितीची गरज नाही," असे सुदानी यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, अशा कोणत्याही निर्णयासाठी इराकी संसदेची मंजुरी अनिवार्य असेल, असेही सरकारने म्हटले आहे दुसरीकडे, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी ब्रिटनच्या परराष्ट्र मंत्री यवेट कूपर यांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. "जर ब्रिटनने आपले लष्करी तळ अमेरिकेला इराणविरुद्ध वापरू दिले, तर ती इराणवर केलेली थेट कारवाई मानली जाईल," असा इशारा अराघची यांनी दिला. इराणने स्पष्ट केले आहे की, स्वतःच्या संरक्षणासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात आणि गरज पडल्यास अशा लष्करी तळांना लक्ष्य करण्यासही मागे-पुढे पाहणार नाहीत, असेही त्यांनी म्हटले.

# गुरु रविदास आणि कांशीरामजी यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथे रविवारी इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांचे व्याख्यान !

भारत संग्राम | प्रतिनिधी

**लातूर** : क्रांतिकारी महामानव गुरु रविदास आणि बहुजन नायक मान्यवर कांशीरामजी यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त लातूर येथे रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सुप्रसिद्ध साहित्यिक, पत्रकार परखड वक्ते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांचे व्याख्यान व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय रविदास परिषद जिल्हा लातूरच्या वतीने भालचंद्र ब्लड बँक सभागृह, मध्यवर्ती बस स्टँडजवळ लातूर येथे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय रविदास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव अगावने (सोलापूर) हे राहणार असून राष्ट्रीय चर्मकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी



आमदार बाबुरावजी माने (मुंबई) आणि लातूर महानगर पालिकेच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. "गुरु रविदासांच्या संकल्पनेतील बेगमपुरा राज्य तसेच मान्यवर कांशीराम जी यांच्या संकल्पनेतील सम्राट अशोकाचे राज्य आणि भारतीय संविधान" या विषयावर अखिल भारतीय बहुजन समता परिषद आणि गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक नेते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर (नांदेड) हे यावेळी प्रमुख वक्ते म्हणून व्याख्यान देणार आहेत. ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. आर. डी. निटूरकर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता एन. डी. शिंदे, तुळजाई हॉस्पीटल लातूर येथील डॉ. महेंद्र सोनवणे आणि



आदिवासी समाजाचे नेते गुणवंत एस. मिसलवाड (नांदेड) यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे असे संयोजन समितीचे बालाजी साबळे, खंडेराव बनसोडे, बाबुराव वाघमारे, श्रीनिवास वाघमारे, राहुल मोटे यांनी कळविले आहे. व्याख्यानापूर्वी समाजातील कांही मान्यवरांचा गुणगौरव यावेळी करण्यात येणार आहे. या भव्य दिव्य कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. सोमेश्वर बनसोडे, दीपक वाघमारे, खंडू कांबळे, रामेश्वर वाघमारे, विष्णू शिवणीकर, शेषराव हलगरकर, रामदास गव्हाळे , सचिन कांबळे, राजकुमार शिंदे, संजीव वाघमारे, प्रा. डॉ. अंगद चित्ते, अंगद वाघमारे, पप्पू कांबळे, काशिनाथ नाबदे, राजकुमार वाघमारे, रामदास नवखंडे, प्रा. बाबासाहेब सोनवणे, मधुकर शेवाळकर, श्रीराम वाघमारे, सौदागर कांबळे, उमाकांत यादव, प्रा. विठ्ठल समदडे, व्यंकट कांबळे, शिवाजी दामले, वाडीकर साहेब, ज्ञानदेव कांबळे आदींनी केले आहे.

# ना. इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याला यश

## वसंत उद्यानाच्या पुनर्निर्माणासाठी 19 कोटी 90 लाख रुपये मंजूर

भारत संग्राम | प्रतिनिधी

**पुसद** : हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या स्मृती साठी बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय लगत उभारलेले वसंत उद्यान च्या पुनर्निर्माण व सर्वांगीण विकासासाठी ना. श्री इंद्रनील नाईक साहेब यांच्या सतत च्या पाठ पुराव्या ने महायुती सरकारच्या माध्यमातून तब्बल 19 कोटी 90 लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे.

> **सततच्या पाठपुराव्यामुळे वसंतरावजी नाईक साहेब यांच्या स्मृतीसाठी उभारण्यात आलेल्या या वसंत उद्याना च्या पुनर्निर्माण आणि सर्वांगीण विकासासाठी महायुती सरकारने भक्कम निधी दिल्याबद्दल महायुती सरकारचे आभार.**
>
> **- ना. श्री इंद्रनील नाईक साहेब**



पुसद परिसरातील वसंत प्रेमी आणि स्थानिक पुसद करांच्या वतीने या निर्णयामुळे आनंद व्यक्त होत असून महायुती सरकार व इंद्रनील नाईक यांच्या प्रति समाधान व्यक्त करीत आहे. वसंतराव नाईक यांच्या अलौकिक योगदानामुळे पुसद शहराला महाराष्ट्रभर सामाजिक ओळख मिळाली आहे. त्यांच्या स्मृतीसाठी पुसद शहरामध्ये वसंत उद्यान निर्माण करण्यात आले. पण विविध तांत्रिक व प्रशासकीय अडचणीमुळे या उद्यानाचे विकासाचे व देखभालीचे काम रखडले होते. वसंतराव नाईक साहेब यांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करीत महायुती सरकारने राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या मागणीचा व पाठ पुराव्याचा विचार करून वसंत उद्याचा कायापालट करण्यासाठी तब्बल 19 कोटी 90 लाख रुपये मंजूर करून पुसदकर वसंत प्रेमींना आनंदाची वार्ता दिली आहे. वसंतराव नाईक यांच्या विविध वस्तूंच्या संग्रहालयासह त्यांच्या स्मृती जपण्यासाठी व वसंत उद्यान पुनर्निर्मांना साठी मिळालेल्या या निधीसाठी ना. इंद्रनील नाईक यांनी राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, श्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांचे आभार मानले आहे. पुढील कमी कालावधीमध्ये शेती आणि शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राच्या विकासाचा शाश्वत पाया घालून महाराष्ट्राला देशात अव्वल राज्याचा दर्जा मिळवून देणाऱ्या वसंतरावजी नाईक साहेब यांच्या स्मृतीसाठी उभारलेल्या वसंत उद्यान च्या पुनर्निमानाचे कार्य पूर्णत्वास जावो ही जनभावना सर्वत्र ऐकावयास मिळत आहे.

# ५० हजारांची लाच घेताना महिला कार्यकारी अभियंता अटकेत!

भारत संग्राम | प्रतिनिधी

**नाशिक** : सिमेंट बंधारा दुरुस्ती कामांचे देयक मंजूर करण्यासाठी ७२ हजार रुपयांची मागणी करीत तडजोडीअंती ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना नाशिक जिल्हा परिषदेतील लघू पाटबंधारे विभागाच्या महिला कार्यकारी अभियंत्यासह वरिष्ठ सहायक लेखाधिकारी अशा दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. संशयितांना न्यायालयाने एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

नाशिक जिल्हा परिषद, लघू पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता (वर्ग एक) वैशाली तुळशीराम ठाकरे (४२) आणि याच कार्यालयातील वरिष्ठ सहायक लेखाधिकारी (वर्ग



तीन) अरूण रमेश धारणकर (५१) अशी अटक झालेल्या संशयितांची नावे असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून देण्यात आली. त्र्यंबकेश्वर येथील त्र्यंबकराज कृपा मजूर आणि बांधकाम सहकारी सोसायटीने गडदवणे व तुंगारपाडा (ओझरखेड) येथील लघू पाटबंधारे योजना (शून्य ते १०० हेक्टर सिंचन) बिगर आदिवासी क्षेत्र स्थानिक संस्थांना सहायक जिल्हा योजना, सर्वसाधारण योजना, सहायक अनुदाने अंतर्गत सिमेंट कॉंक्रिट बंधारा दुरुस्तीची कामे निविदेनुसार पूर्ण केली होती. या कामांचे १६ लाख १९ हजार २९० रुपयांचे देयक मंजूर करण्यासाठी नाशिक जिल्हा परिषदेतील लघू पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता वैशाली ठाकरे आणि वरिष्ठ सहायक लेखाधिकारी अरूण धारणकर यांनी सुरुवातीला ७२ हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती ५० हजार रुपयांची लाच मागितली.

# 'साखरपुडा मोडला, लग्नानंतरही माझ्यावर अत्याचार'

## सात वर्षानंतर पीडितेने मौन सोडलं, नाशिकची 'कॅप्टन फाईल्स'

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई** : महिलांच्या लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याच्यासंदर्भाने नवनवी माहिती समोर येत आहे. पीडित महिलेशी ओळख ते अनेक वर्षे अत्याचार अशी कॅप्टन खरातची क्रूर कहाणी समोर आली आहे.

विशेष पोलीस पथकाच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वात पोलीस कॅप्टन फाईल्सचा कसून तपास करीत आहेत. दरम्यान पीडितेने आपल्यावर ओढावलेली आपबीती तक्रारीतून



पोलिसांना सांगितली आहे. नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील भोंदूबाबा अशोक खरात याच्याकडे भविष्य जाणून घेण्यासाठी महाराष्ट्रातील बड्या नेत्यांसह सगळ्याच क्षेत्रातील दिग्गजांची उठबस होती. याच माध्यमातून त्याने करोडो रुपयांची माया जमवली. श्रीमंत महिलांना गाठून, त्यांच्याशी सलगी निर्माण करून, त्यांना विश्वास संपादन करून कॅप्टन अशोक खरात त्यांचे शोषण करीत असे. तसेच महिलांकडून तो वारंवार पैसेही उकळत असल्याची माहिती आहे. कॅप्टन खरातने एका पीडितेला फसवून कसा अत्याचार केला, याची कहाणी समोर आली आहे. साखरपुडा मोडला, लग्नानंतरही माझ्यावर अत्याचार, सात वर्षानंतर पीडितेने मौन सोडलं २०१९ साली कॅनडा कॉर्नर येथे पीडितेशी अशोक खरात याची ओळख झाली. माझ्याकडे दैवी शक्ती असल्याचे सांगून अशोक खरात याने महिलेचा विश्वास संपादन केला. महिलांच्या दैनंदिन आयुष्यातील अडथळे दूर करण्यासाठी अशोक खरात विविध विधी करीत असे.

### महिलांवर अत्याचार कसा करायचा? कॅप्टनची मोडस ऑपरेंडी समोर

**मी कृष्णाचा अवतार आहे. तू मागच्या जन्मातील माझी राधा आहे, असे सांगून महिलेच्या डोक्यावर तांब्या-लोटा ठेऊन कॅप्टन खरात त्यांच्या कानाजवळ पुटपुटायचा. त्यापूर्वी पेढा आणि कडवट -खारट चव असलेले पाणी प्यायला द्यायचा. महिलांना गायत्री मंत्री म्हणायला लावायचा आणि लागलीच त्यांना अंगाला स्पर्श करायला सुरुवात करायचा. महत्त्वाचे म्हणजे महिलेसोबत आलेल्या व्यक्तींना ध्यानस्थ पूजेच्या नावाखाली त्याच्या दालनाबाहेर बसवून ठेवायचा. महिलांना गुंगी आली की त्यांचे लैंगिक शोषण करीत असे. कॅप्टन अशोक खरातच्या लैंगिक शोषणाचा हा पॅटर्न होता. कधीकधी संमतीने तर कधी जबरदस्तीने तो महिलांवर अत्याचार करीत असे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून त्याची काळी कृत्ये सुरू असल्याची माहिती आहे.**

### बंद घरात घुसून अतिक्रमण

**यवतमाळ** : राणा प्रताप गेट जवळील जिरापुरे ले-आऊटमधील एका बंद घरात कुलूप तोडून बेकायदेशीररीत्या प्रवेश केल्याची घटना उघडकीस आली आहे. मूळच्या सुरत (गुजरात) येथे प्राध्यापक असलेल्या फिर्यादी गितांजली अमन महाले (३६) या बाहेरगावी असताना १० फेब्रुवारी रोजी ही घटना घडली. मालमत्तेची चोरी किंवा आर्थिक नुकसान करण्याच्या उद्देशाने आरोपी मोहिनी देशमुख, रिता देशमुख आणि एका अनोळखी व्यक्तीने (सर्व रा. धामणगाव रेल्वे) संगनमत करून हे कृत्य केले. याप्रकरणी १९ मार्च रोजी अवधूतवाडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## # SHORT NEWS

### ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पांढरकवडा:** महसूल विभागाने अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करत रेतीसह ट्रॅक्टर जप्त केला आहे. ही कारवाई तेलंगटाकळी शिवारात ३१ जानेवारी रोजी दुपारी १:१९ वाजता करण्यात आली. आरोपी महादेव सोनेराव दंडाजे (३१) आणि निलेश बंडेवार (२८, दोघे रा. किणी) हे एमएच ३२ ए ५०९८० क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून १ ब्रास रेतीची विनापरवाना वाहतूक करताना आढळले. मंडळ अधिकारी गोवर्धनदास दावडा यांनी ६ लाख रुपयांचा ट्रॅक्टर आणि ८ हजार रुपयांची रेती असा एकूण ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### ६७ हजारांच्या कॉपर केबलची चोरी

**जंगल वडगाव:** वरुड शिवारातील धरणावर शेतकऱ्यांनी सिंचनासाठी बसवलेल्या कृषी पंपाच्या कॉपर केबल अज्ञात चोरट्यांनी कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी १ ते २ फेब्रुवारीच्या मध्यरात्री दरम्यान घडली. विष्णू सोनबा काटपेल्लवार (६२, रा. जवळा) आणि इतर शेजारील शेतकऱ्यांच्या शेतातील सुमारे १५२० फूट लांबीची कॉपर केबल चोरट्यांनी लंपास केली. चोरीला गेलेल्या मालाची एकूण किंमत ६७,९५० रुपये आहे. याप्रकरणी २ फेब्रुवारी रोजी जंगल वडगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ३० हजारांची दुचाकी लंपास

**उमरखेड:** शेतशिवारातून शेतकऱ्याची ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेल्याची घटना घमापूर (कुरळी) येथे घडली. फिर्यादी नितीन केशर राठोड (३३) यांनी आपली हिरो फॅशन प्रो (क्रमांक एमएच २९ बीए ०३९३) ही दुचाकी २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ९:३० वाजता शेतात उभी केली होती. कोणीतरी अज्ञात चोरट्याने ही जुनी वापरती दुचाकी चोरून नेली. २ फेब्रुवारी रोजी दराटी पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार नोंदवण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

### २५ हजारांचे बैल चोरीला

**पारवा:** शेतकऱ्याचे दोन पांढऱ्या रंगाचे बैल गोठ्यातून चोरीला गेल्याची घटना घाटंजी तालुक्यातील झटाळा येथे घडली. २ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. फिर्यादी नितीन दिलीपराव जैस्वाल (३०, रा. झटाळा) यांच्या मालकीचे २५ हजार रुपये किमतीचे दोन बैल अज्ञात चोरट्याने पळवून नेले. याप्रकरणी पारवा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## थोडक्यात

### कुक्कुटपालन व्यवसायिकाना अध्यादेशानुसार कृषी समकक्ष दर्जाच्या सुविधा द्या : अनिल खामकर

भारत संग्राम | प्रतिनिधी



**पेण :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कुक्कुटपालन दुग्ध व्यवसाय मत्स्यपालन यां व्यावसायिक शेतकऱ्यांना कृषी समकक्ष दर्जा व कृषी समतुल्य सर्व सुविधा देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत व विधीमंडळ सभागृहात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी जाहीर करुन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले सभागृहात अभिनंदन करुन असा निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.मात्र याकामी शासनाने काढलेल्या अध्यादेशांचे पालन अमंळबजावणी पशुसंवर्धन आयुक्त पुणे व ग्रामविकास सचिव यांना या अध्यादेशाची माहिती असून देखील कृषी दर्जाच्या सुविधा न दिल्याने कुक्कुटपालन व्यवसायिकामधे या बाबत असंतोषाची तीव्र भावना उमटली आहे. माननीय मंत्रीमहोदयानी काढलेले अध्यादेश प्रशासकीय पातळीवर सर्व विभागांना माहिती असताना देखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यामागे कोणाचा दबाव आहे.जर मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या शासकीय निर्णय पाळले जात नसल्यास या विरोधात कुक्कुटपालन शेतकरी राज्यव्यापी आंदोलन छेडणार असा सूचक इशारा महाराष्ट्र राज्य पोल्ट्रीयोध्दा संघटनेचे अध्यक्ष अनिल अनिल खामकर यांनी या संदर्भात पेण येथील पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले आहे. राज्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसायास चांगली चालना मिळण्याच्या दृष्टीने तसेच, हा व्यवसाय दुर्बल घटकांतील जास्तीत जास्त लोकांनी स्विकारावा म्हणून कुक्कुट पालन व्यवसायास विविध सोयी सवलती देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. याबाबतचे आदेशही पारीत झाले आहेत असे असताना पशुसंवर्धन आयुक्त कार्यालयात गेली दोन वर्षे आंदोलने बैठकांचा सिलसिला करुन देखील संबंधीत आयुक्त व्यावसायिक शेतकरी बांधवाना सोयीसुविधा देण्याबाबत सतत दुर्लक्षीतपणा करीत असल्याचा आरोप अनिल खामकर या प्रसार माध्यमांसमोर खुलासा केला.याशिवाय ग्रामविकास मंत्रालयाचे सचीवांनी विधान परिषदेच्या २०२३नागपुर हिवाळी अधिवेशनात १९डिसेंबर रोजी सदस्य सत्यजित तांबे यांनी राज्यातील कुक्कुटपालन व इतर शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडून अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीद्वारे वेगवेगळ्या पध्दतीने कराची आकारणी केली जात आहे. त्यामुळे कुक्कुटपालन व्यावयायिकांकडून वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा कर आकारला जात आहे" असा मुद्दा उपस्थित केला होता. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब शासन अधिसुचना, क्र.व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४(२२), दिनांक ३१/१२/२०१५ रोजीच्या शासन अधिसूचनेमधील स्पष्टीकरणामधील मुद्दा क्र. (आठ) मध्ये "जनावरांचे गोठे, कुक्कुटपालन व तशाच प्रकाराशी निगडीत इमारती यांकरिता इमारतींच्या प्रकारांनुसार निवासी वापराप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल" असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सदर शासन अधिसूचना दि.३१/१२/२०१५ मधील तरतुदींनुसार ग्रामपंचायतींनी कर आकारणी करावी असे आपल्या अखत्यारितील सर्व ग्रामपंचायतींना सूचित करावे, असे उप सचिवांनी काढलेला आदेश सद्यस्थितीत ग्रामविकास सचिवांनी कायम लागू केल्याने कृषी समकक्ष दर्जा व मिळणा-या सोयी सुविधा मिळणार नाहीत. याबाबत मंत्रीमहोदय गिरीश महाजन आणि मंत्रीमहोदय राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांना भक्कम पाठबळ दिले याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतो.पण जे शासन स्तरावर तबल ७७लाख कुक्कुटपालन व्यवसायाचा २४ टक्के वाटा मिळत असताना देखील शासकीय अध्यादेशाती कृषी समकक्ष दर्जा व त्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व सवलती आकारणी करावी अशी संघटनेची व शेतकरी बांधवांची मागणी आहे त्याची पुर्तता न झाल्यास राज्यभरात आंदोलन छेडले जाईल असा सूचक इशारा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर यांनी शासकीय अधिकाऱ्यांना दिला आहे.

## रामकथा केवळ ऐकण्यासाठी नाही



भारत संग्राम | प्रतिनिधी

**हिंगोली :** भागवत कथा श्रवण केल्यानंतर मानवाचे जीवन पवित्र होते, तर रामकथा केवळ ऐकण्यासाठी नसून प्रभू श्रीरामांच्या आदर्श मार्गावर चालण्याचा संदेश देते असे प्रतिपादन प. पूज्य रमेशभाई ओझा यांनी शुक्रवारी ता. २० येथे केले.

येथील रामलीला मैदानावर गजराज बाल गणेश मंडळाच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत कथा कार्यक्रमात त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रमेशभाई ओझा यांनी अनेक दाखले देत भागवत कथा मानवाच्या जीवनात काय परिवर्तन घडवून आणते यांचे स्पष्टीकरण दिले. रामायण व महाभारतातील उदाहरणे देत सांगितले की, भगवान श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांसारख्या अवतारांनाही जीवनात अनेक दुःख व संकटांचा सामना करावा लागला. त्यामुळे सामान्य माणसाच्या आयुष्यात येणाऱ्या अडचणींचे फारसे मोल नाही, तर त्यातून मार्ग काढण्याची शिकवण महत्त्वाची आहे. भगवान श्रीरामांनी आपल्याला संकटांशी लढण्याची प्रेरणा दिली, तर भगवान श्रीकृष्णांनी जीवनातील संघर्षात कसे झुंजायचे, याचे तत्त्वज्ञान दिले असल्योच सांगत त्यांनी दोन्ही अवतारांच्या जीवनातील गुढ अर्थ उलगडून सांगितला. भागवत कथेचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, भागवत कथा हीच सर्वोत्तम साधना आहे. भागवत आणि रामकथेचे आयोजन आपण का करतो? त्यामागचे खरे प्रयोजन काय आहे?" यावर त्यांनी उत्तर देताना सांगितले की, केवळ परंपरा म्हणून नव्हे, तर आत्मपरिवर्तनासाठी कथा ऐकणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नवविधा भक्तीमध्ये श्रवण करणे हि देखील एक प्रकारची भक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने मोफत पक्षांसाठी कमंडलू जल पात्र वाटप

### पशु. पक्षी ही जंगलाची शान व गौरव आहे --देविदास शर्मा

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे





**बुलढाणा :** उन्हाळ्याचे दिवस लक्ष्यात घेता पक्ष्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती रोखण्यासाठी जंगलात जाऊन भोपळे आणुन त्यांना कमंडलू आकार देऊन जल पात्राची निर्मिती करून जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधुन दिं २० मार्च २०२ ६ शुक्रवार रोजी कमंडलु जलपात्र ३५० च्या वर वाटप करण्यात आले पशु पक्षी ही जंगलाची शान व गौरव आहे मानवाच्या प्रमाणे त्यांना ही जगण्याचा अधिकार आहे रखरखत्या उन्हात सावली साठी व चिमुटभर दाण्यासाठी चिमणी व पक्षी यांची भटकंती दिसून येते मात्र वाढते प्रदुषणा मुळे चिमणी व पक्षी संकटात आले आहे या लहानश्या जिवाला वाचवण्यासाठी जागतिक पातळीवर २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस साजरा केला जातो सध्यस्थितीत चिमणी काळाच्या ओघात लुप्त होण्याच्या वाटेवर आहे त्यांच्या विषयी समाजात जागृती निर्माण व्हावी त्यांचे योग्य संवर्धन व्हावे या करीता शहरातील सामाजिक संस्था श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे वतीने दरवर्षी जल पात्र वाटप केले जाते मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा व त्यांचे सहकारी हे मागिल २६ वर्षा पासून तलाव रोड. घाटपुरी रोड. शेगाव रोड आदी ठिकाणी जाऊन जंगली दुधी भोपळे आणुन त्यांना सुकवतात व नंतर त्यांना कमंडलू आकार देऊन जल पात्राची निर्मिती करतात हे कमंडलू ( कुंड्या ) पर्यावरण पूरक व नैसर्गिक असुन पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी योग्य ठरत आहे विषेश म्हणजे या कुंड्या वाटप ही मंडळाच्या वतीने ज्या ठिकाणी पक्ष्यांची संख्या जास्त असेल अश्या ठिकाणी वाटप करण्यात येतात मुन्ना शर्मा यांच्या या उपक्रमाची दखल घेत त्यांना अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देवून संम्मानित करण्यात आले आहे आज दिं २० मार्च शुक्रवार रोजी चिमणी दिवसाचे निमित्त कमंडलु जलपात्र वाटप करण्यात आल्या व जनावरांना पाणी पिण्यासाठी जनुना येथे हौद लावण्यात आला या प्रसंगी प्रमुख उपस्थितीत मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे. प्रमोद गायकवाड. रामकृपाल शर्मा. अर्जुन जाधव.लालाजी सांगळे. कृष्णा सुकाळे.रमण अग्रवाल व परीसरातील नागरिकांची उपस्थिती होती अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

## केक नाही,ज्ञानाची भेट; सामाजिक कार्यकर्ता गजानन काळे यांच्या वाढदिवसानिमित्त चिमुकल्यांना परीक्षा पॅड वाटप

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** परीक्षा जवळ आल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मदत व्हावी या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ता तथा मालेगाव नगरपंचायतच्या नगरसेविका रज्जु काळे यांचे पती गजानन काळे (पाटील) यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चिमुकल्या विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हा कोणत्याही वाढदिवसाच्या भेटीपेक्षा अधिक मोलाचा ठरला गोरगरीब शालकरी मुलांसाठी हा वाढदिवस खऱ्या अर्थाने आनंदाचा उत्सव बनला यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.अनुपमा राजेंद्र देशमुख,राजेंद्र देशमुख सर,किसन राजे सर,सुनिल राऊत सर,कु.अर्चना देशपांडे,कु. नेहा मांडवगडे मॅडम,मिलिंद भगत सर,प्रदीप खिल्लारे सर तसेच शाळा समिती सदस्य धीरज हुकुमचंद कान्हेड उपस्थित होते तसेच नगरपंचायतचे लोकनियुक्त नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे,नगर उपाध्यक्ष महादेवराव खवले,नगरसेवक सनी घुगे,अभि घुगे,मो.जाफर,संजय सारडा,अक्षय बळी,ज्ञानेश्वर काटेकर,सागर अहिर,विशाल बनचरे,राहुल चोपडे,उदय तोंडे,मयुर भोयर,अभी देवकते,पुष्पम शिंदे,भातूडकर आदी मान्यवरांनी उपस्थित राहून वाढदिवस साजरा केला व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या समाजासाठी प्रेरणादायी संदेश: वाढदिवस साजरा करण्याची ही वेगळी आणि समाजोपयोगी पद्धत असून प्रत्येकाने आपल्या आनंदाच्या क्षणी गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचा प्रयत्न करावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## मालेगावात बेकायदेशीर खनिज वापराचा मोठा प्रकार उघड; ;प्रशासनावर कारवाईसाठी दबाव!

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** मालेगाव शहरातील सुरू असलेल्या रस्ते व नाली बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर खनिजांचा वापर होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे यासंदर्भात वंचित बहुजन आघाडीचे महासचिव संदीप पखाले यांनी तहसीलदार यांना निवेदन देत तात्काळ चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे निवेदनात नमूद केल्याप्रमाणे,

शहरातील विविध भागांमध्ये सिमेंट रस्ते व नाली बांधकामे सुरू असताना मोठ्या प्रमाणात मुरूम,खडी,रेती यांचा वापर केला जात आहे मात्र,या खनिजांच्या वापरासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेतल्या गेल्या आहेत का,याबाबत गंभीर शंका व्यक्त करण्यात आली आहे विशेष म्हणजे,अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात खनिज साहित्य उतरवले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे त्यामुळे महसूल विभागाला मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे तसेच,संबंधित विभागातील काही कर्मचाऱ्यांकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे या पार्श्वभूमीवर संबंधित बांधकामांची प्रत्यक्ष पाहणी करून,वापरण्यात आलेल्या खनिजांचे मोजमाप करावे,कंत्राटदारांकडे आवश्यक परवानग्या आहेत का याची खातरजमा करावी,आणि बेकायदेशीर वापर आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी,अशी मागणी संदीप पखाले यांनी केली आहे तसेच,या निवेदनाची प्रतिलीपी जिल्हाधिकारी,वाशिम,उपविभागीय अधिकारी (महसूल),वाशिम तसेच पोलीस निरीक्षक,मालेगाव यांना देण्यात आल्यामुळे या प्रकरणाची दखल उच्चस्तरावर घेतली जावी,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.नियमांचे उल्लंघन करून शासनाच्या महसुलात नुकसान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून महसूल वसूल करावा,अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे या प्रकरणामुळे शहरातील विकासकामांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून,प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## एक ठिणगी...संपूर्ण जंगल भस्म; मालेगाव वनविभागाची वनवणवा नियंत्रणासाठी जनजागृती मोहीम सुरू

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**वनसंरक्षण हीच खरी जबाबदारी!"**

**वनवणवा नियंत्रणासाठी केवळ शासकीय यंत्रणा सजग असून पुरेसे नाही,तर प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागणे अत्यावश्यक आहे जंगल परिसरात आग लावणे टाळावे,पर्यटकांनी विशेष सावधगिरी बाळगावी तसेच कुठेही धूर किंवा आग दिसल्यास त्वरित वन विभागाला माहिती द्यावी,असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश काळे यांनी केले आहे.**

**मालेगाव :** उन्हाळ्याची चाहूल लागताच जंगलातील गवत,पानगळ व लहान झुडपे कोरडी पडू लागतात आणि याच काळात वनवणव्याचा धोका अधिक वाढतो वनवणवा ही पर्यावरणासाठी अत्यंत गंभीर समस्या ठरत असून,या पार्श्वभूमीवर मालेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाच्या वतीने फेब्रुवारी महिन्यापासून वनवणवा नियंत्रण व जनजागृती मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला आहे वनवणव्यामुळे झाडे,झुडपे तसेच औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणावर नष्ट होतात जंगलातील प्राणी,पक्षी व कीटकांचे अधिवास धोक्यात येऊन अनेकदा वन्यजीवांचा मृत्यू होण्याचीही शक्यता निर्माण होते परिणामी,संपूर्ण जैवविविधतेवर गंभीर परिणाम होतो याशिवाय,आगीमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणात धूर व कार्बन उत्सर्जन वाढून पर्यावरणीय समतोल बिघडतो या संदर्भात बोलताना वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश काळे यांनी सांगितले की, "बहुतेक वेळा मानवी निष्काळजीपणाच वनवणव्याचे मुख्य कारण ठरते जंगल परिसरात बीडी-सिगारेट ओढून टाकणे,माचिसच्या काड्या फेकणे,कचरा किंवा गवत जाळणे,तसेच शेती साफ करण्यासाठी लावलेल्या आगीमुळे वणव्याचे प्रमाण वाढते." वनवणवा नियंत्रणासाठी वन विभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत यामध्ये फायर लाईन तयार करणे,नियमित गस्त ठेवणे,अग्निशमन साहित्य उपलब्ध करून देणे तसेच स्थानिक ग्रामस्थ व वनसंरक्षण समित्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे यांचा समावेश आहे आग लागल्यास तातडीने नियंत्रण मिळवण्यासाठी वन कर्मचारी व स्थानिक स्वयंसेवक सातत्याने प्रयत्नरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले या मोहिमेत क्षेत्र सहाय्यक,वनरक्षक व वनमजूर यांचा सक्रिय सहभाग आहे.

## अवकाळीग्रस्त भागाचे तत्काळ पंचनामे करा : आ. कुल

भारत संग्राम | प्रतिनिधी



**दौंड :** दौंड तालुक्यात दि. १८ व १९ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्रामुख्याने यवत, यवत स्टेशन, उंडवडी, खामगाव, खानोटे, पिलानवाडी, दहीटने आणि राहू या गावांमध्ये पिकांचे नुकसान झाले असल्याचे समोर आले आहे.

बळीराजा आधीच संकटात असताना या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. या परिस्थितीची गंभीर दखल घेत, मी संबंधित महसूल विभाग आणि कृषी प्रशासनाला तात्काळ घटनास्थळी जाऊन नुकसानीचे 'वस्तुनिष्ठ पंचनामे' करण्याचे आदेश दिले आहेत. नुकसानीचा अहवाल लवकरात लवकर शासनाकडे सादर करून बाधित शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. एकाही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

# प्रा. डॉ. मिनल गावंडे यांच्या प्रयत्नांना यश; राऊतवाडी चौकातील सिग्नल हटवला...

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे



**चिखली :** शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील राऊतवाडी चौक आता वाहतुकीस सुरळीत आणि सुरक्षित झाला आहे. या चौकातील सिग्नलमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता, विशेषतः चिखली-बुलढाणा मार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्यामुळे प्रभाग क्रमांक १ च्या नगरसेविका प्रा. डॉ. मिनल गावंडे यांनी या समस्येकडे लक्ष देऊन नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यांनी चौकातील सिग्नल हटवून त्याऐवजी हायमास्ट लाईट बसवण्याची मागणी केली, ज्यामुळे नागरिकांना सोय होईल आणि अपघात टाळता येतील. नगरपालिकेने तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत सिग्नल हटवण्याची कारवाई केली. राऊतवाडी चौक हे शहरातील महत्त्वाचे आणि गर्दीचे ठिकाण मानले जाते. येथे दिवसभर दुचाकी, चारचाकी तसेच जड वाहनांची सतत ये-जा सुरू असते. वाहतुकीतील अडथळा आणि नियमांचे उल्लंघन यामुळे अपघातांची शक्यता वाढत होती, त्यामुळे सिग्नल हटवण्याचा निर्णय घेणे अत्यंत आवश्यक होते. याशिवाय, एप्रिल महिन्यात चिखलीचे आराध्यदैवत आई रेणुका उत्सव साजरा होतो. या निमित्ताने वगदी प्रदक्षिणा कार्यक्रम राऊतवाडी चौकात मोठ्या प्रमाणात आयोजित केला जातो, ज्यामध्ये शहर आणि ग्रामीण भागातील नागरिक प्रचंड उपस्थित राहतात. नगरसेविका प्रा. डॉ. मिनल गावंडे यांच्या प्रयत्नांमुळे, या कार्यक्रमादरम्यान नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत वाहतूक सुनिश्चित होईल, तसेच अपघात टाळण्यास मदत होईल.

भारत संग्राम (मराठी दैनिक) ● RNI No. MAHMAR/2020/79677

मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक "भारत संग्राम", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) संपादक - महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## घटना -घडामोडी



## मालेगाव शाखा संचालकासाठी तिरंगी लढत!

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

**मालेगाव :** दि,अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव बँक संचालक पदासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची बुधवार,१८ मार्च ही अंतिम तारीख असताना अंतिम तारखेला मालेगाव शाखा संचालक पदासाठी दोन जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत त्यामुळे आता बँकेच्या संचालक पदासाठी नितीन दिलीपराव जाधव,गोपाल पाटील राऊत व प्रकाश पाटील कुटे या तिघा उमेदवारांचे अर्ज कायम राहिल्याने मालेगाव शाखा संचालक पदाची निवडणूक ही अखेर तिरंगी ठरली आहे तालुक्यातील राजकारणात जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह बँक निवडणूक ही अतिशय महत्त्वाची ठरली असून,होणारी ही निवडणूक अटीतटीची व काट्याच्या लढतीची होणार ही शक्यता असताना या निवडणुकी करिता मालेगाव शाखा संचालक पदासाठी एकूण पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते अर्ज मागे घेण्याची आजची १८ मार्च ही अंतिम तारीख असताना अंतिम तारखेला ॲड.रवींद्र गवळी,राजू चंदू जाधव या दोघा उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहे त्यामुळे आता या निवडणुकीत नितीन दिलीपराव जाधव,गोपाल पाटील राऊत,तसेच प्रकाश पाटील कुटे या तिघा उमेदवारांचे अर्ज कायम राहिले असल्याने निवडणूक रिंगणात आता तिन्ही उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे ठाकले आहे त्यामुळे होणारी ही निवडणूक तिरंगी ठरली आहे मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीचे मतदान रविवार,२९ मार्च रोजी असून या निवडणूक प्रचाराला आता वेग आला आहे तर उमेदवारांसह त्यांचे समर्थक,कार्यकर्ते तसेच राजकीय नेते मंडळीही जोमाने प्रचाराला भिडली आहे या निवडणुकीत साम,दाम,दंड या भेदनीतीचा वापर केल्या जात असून निवडणुकीकरिता आर्थिक उलाढाल होण्याची शक्यता असून तशी चर्चाही तालुक्यात सुरू झाली आहे त्यामुळे निवडणुकीकडे मतदारांचे लक्ष लागले आहे मागच्या पंचवार्षिक मध्ये माजी संचालक प्रकाश पाटील कुटे व विद्यमान संचालक दिलीप जाधव हे एक मेकांच्या विरुद्ध असताना यामध्ये दिलीपराव जाधव दोन मताने निवडून आले होते,यावेळी माजी संचालक प्रकाश पाटील कुटे,तसेच नितीन दिलीपराव जाधव,तसेच तिसरे उमेदवार म्हणून गोपाल पाटील राऊत हे उभे आहेत या तिरंगी लढतीमध्ये संचालकांसाठी उभे असलेले तिन्ही उमेदवाराचा दांडगा संपर्क असून सर्वच उमेदवारांनी तालुक्यातील ८८ मतदारांना भेटले असून संपर्कात आहेत उमेदवार येणाऱ्या २९ तारखेला मतदान झाल्यानंतर कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडेल हे चित्र,३० मार्च ला असलेल्या मतमोजणी नंतरच स्पष्ट होईल,याकडे सर्व तालुक्यातील जनतेचे लक्ष लागलेले आहे.



## वारकऱ्यांच्या उत्कर्षासाठी क्रांती शिवाय पर्याय नाही : त्यागमूर्ती वासुदेव शास्त्री

भारत संग्राम | प्रतिनिधी

**बुलढाणा :** वारकऱ्यांचा उत्कर्ष आणि ज्वलंत समस्या सोडवण्यासाठी, वारकरी धर्म परिषद वैचारिक प्रबोधनासह,आंदोलन आणि क्रांतीच्या दिशेने वाटचाल करणार आहे. देशाची वर्तमान परिस्थिती पाहता क्रांती शिवाय पर्यायच शिल्लक नाही.असे मत वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष त्यागमूर्ती वासुदेव महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले. 19 मार्चला गुडीपाडव्याच्या पर्वावर नांदुरा तालुक्याअंतर्गत येणाऱ्या त्रिवेणी तट निवासी निंबादेवी संस्थांनच्या भव्य सभा मंडपात वारकरी धर्म परिषदेच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मनोगत व्यक्त करताना वासुदेव महाराज शास्त्री यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. घाटाखालील जिल्हाध्यक्ष हभप परमेश्वर महाराज घणोकार यांच्या अध्यक्षतेत तर राष्ट्रीय महासचिव प्रबोधनकार अँड.सतीशचंद्र रोठे पाटील, संभाजी महाराज शिर्के, निनाजी महाराज खोडके, रोहित महाराज देवरे, हभप वैष्णवीताई भागवत,हभप आरतीताई आढाव,सचीन महाराज पाटील,अर्चनाताई बावस्कर,सपनाताई मांजरे,हभप.महादेव महाराज,गोविंदा महाराज शिंबरे,कमलाकर व्यवहारे, यांच्यासह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची धर्मपिठावर प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांसह, वारकरी धर्म परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी गोमाता राष्ट्रमाता,ज्वलंत धर्म समस्यांवर प्रबोधनपर विचार व्यक्त केले. त्रिवेणीतट निवासी आदिशक्ती निंबामाता पूजनाने मेळाव्याला सुरुवात करण्यात आली. यावेळी विदर्भ आणि जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देन्यात आले.वारकरी धर्म परिषदेची संहिता आणि पुढील कार्याची दिशा सर्वांनूमते ठराव पारित करून धर्मपिठावरून राष्ट्रीय महासचिव म्हणून रोठे यांनी जाहीर केली. सामूहिक पसायदानाने मेळाव्याची सांगता करण्यात आली. गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा यासाठी शंकराचार्य स्वामी अवमुक्तेश्वरानंद स्वामी यांनी उभारलेल्या राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभाग घेणे. महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांचा निधी वाढविणे, जीर्ण जुन्या मंदिरांचा जिर्नोधार करणे, पंढरपूरच्या वारीतील सहभागी वारकऱ्यांचा सरकारकडून विमा काढणे,इंद्रायणी,भिमा चंद्रभागा स्वच्छता अभियान राबविणे.भजनी मंडळांना दिलेली वयाची अट कमी करणे.माळकरी व्यक्तीलाच वारकरी धर्म परिषदेचे पद देणे.धर्माची सहिंता आणि शिस्तीचे पालन न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे. वार्षिक सभासद नोंदणी शुल्क, या सर्व विविध ठराव धर्मपिठावरून सर्वांनूमते पारित करण्यात आले. शासन प्रशासन स्तरावरील मागण्यांसाठी ठरावांची प्रत पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना वारकरी धर्म परिषदेच्या वतीने सादर करण्यात येणार आहे.

# नको नको ज्योतिषा" : बहिणाबाईंचा शंभर वर्षांपूर्वीचा आवाज आजही तितकाच जिवंत

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रविण पाटील

**नाशिक :** "नको नको ज्योतिषा, माझ्या दारी नको येऊ..." अशा शब्दांत संत कवी बहिणाबाई चौधरी यांनी सुमारे शंभर वर्षांपूर्वी अंधश्रद्धेवर प्रहार केला होता. मात्र, काळ बदलला तरी समाजाची मानसिकता कितपत बदलली आहे, हा प्रश्न आजही कायम आहे. नाशिकमध्ये 'कॅप्टन अशोक खरात' नावाच्या स्वयंघोषित ज्योतिषाला पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर बलात्कार आणि लैंगिक शोषणासारखे गंभीर आरोप आहेत. पोलिसांच्या तपासात त्याच्या पेन ड्राईव्हमधून ५८ आक्षेपार्ह व्हिडिओ सापडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष



म्हणजे, या व्यक्तीकडे अनेक राजकीय नेत्यांचीही वर्दळ होती. ही घटना केवळ एका व्यक्तीचा गुन्हा नसून समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या समस्येचं प्रतिबिंब आहे. आपण सहसा असा समज करतो की मोठ्या पदांवर असलेली, उच्चशिक्षित, यशस्वी आणि बुद्धिमान माणसं तर्कशुद्ध विचार करणारी असतात. मात्र वास्तव वेगळं चित्र दाखवतं. सचिन तेंडुलकर, विराट कोहली,



अमिताभ बच्चन, ए. पी. जे. अब्दुल कलाम यांसारख्या मान्यवर व्यक्तीही विविध धार्मिक किंवा अध्यात्मिक गुरूंकडे जाताना दिसतात. यातून एक गोष्ट स्पष्ट होते—माणूस एकाच वेळी बुद्धिमान, यशस्वी आणि अतार्किकही असू शकतो. कारण माणूस 'compartmentalized thinking' करतो—म्हणजे वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळं लॉजिक वापरतो. उच्चपदस्थ लोकांवर प्रचंड



जबाबदाऱ्या, अनिश्चितता आणि ताण असतो. अशा वेळी "काहीतरी आपल्या नियंत्रणात आहे" असं वाटण्यासाठी ते पूजा, वास्तू, ज्योतिष यांसारख्या गोष्टींवर अवलंबून राहतात. हे त्यांच्या मानसिक सुरक्षिततेचं साधन बनतं. जितके stakes मोठे, तितकी अंधश्रद्धा वाढण्याची शक्यता अधिक. उद्योगपती "शुभ मुहूर्त" पाहतात, खेळाडू "लकी चार्म" वापरतात—हे सर्व anxiety कमी करण्यासाठी केलं जातं. कलाविश्वातही हे दिसून येतं. गोविंदा यांच्यासारखा यशस्वी कलाकारदेखील वैयक्तिक आयुष्यात अंधश्रद्धेचा प्रभाव असल्याचं अनेकदा समोर आलं आहे. भारतात धर्म आणि परंपरा खोलवर रुजलेल्या असल्याने, IIT, IAS, CEO स्तरावरील लोकसुद्धा या गोष्टींपासून पूर्णपणे मुक्त नसतात. काही वेळा सामाजिक किंवा राजकीय कारणांमुळेही अशा श्रद्धांचा आविष्कार केला जातो. एकंदरीत, अंधश्रद्धा ही कमी बुद्धिमत्तेची नव्हे, तर मानवी भीती, आशा आणि संस्कारांची देण आहे. त्यामुळेच बहिणाबाईंचा शंभर वर्षांपूर्वीचा प्रश्न आजही तितकाच लागू पडतो—आपण खरंच तर्कशुद्ध झालो आहोत का?

नको नको ज्योतिषा
माझ्या दारी नको येऊ
माझे दैव मला कळे
माझा हात नको पाहू
धनरेषांच्या चऱ्यांनी
तळहात रे फाटला
देवा तुझ्याबी घरचा
झरा धनाचा आटला
म्हणे नशिबाचे नऊ ग्रह
तळहाताच्या रेघोटया
बापा नको मारू थापा
अशा उगा खऱ्या खोट्या

कॅप्टन अशोक खरात व महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे फोटो होताय व्हायरल की रुपाली चाकणकर व राज्यातील दिग्गज नेते यांचा ही संबंध असावा चर्चेला होतेय. महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा

## २३ मार्च रोजी वंचितच्या नागपूर येथे निघणाऱ्या धडक मोर्चा मध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा - - युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष विशाल गवई यांचे आवाहन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** वंचित बहुजन आघाडी किंवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने देशाच्या सर्व बहुमत्व सत्ता आणि स्वातंत्र्याची भाजपा - आर एस एस ने तडजोड केल्याच्या विरोधात नागपूर येथील संघ कार्यालयावर 23 मार्च रोजी सोमवार ला भव्य धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे , या मोर्चाला बुलढाणा जिल्ह्यातील सर्व वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष विशाल गवई यांनी केले आहे ' त्यांनी पुढे म्हटले आहे की सध्या देशाचे वातावरण विषमतावादी लोक दुषित



करीत आहेत सध्या इराण व अमेरिका युद्धामुळे देशांमध्ये गॅस टंचाईचे संकट आहे पेट्रोल डिझेलचे संकट आहे ' या सर्व समस्या असताना देशातील नागरिकांचे लक्ष इतरत्र वळवण्याचा डाव हा संघाचा आहे हा डाव हाणून पाडण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर हे उभे राहिले आहेत , त्यांच्या पाठीशी आपण सर्वांनी उभे राहावे असे आवाहन सुद्धा विशाल गवई यांनी केले आहे '

# हॉटेल गजेंद्र येथे मा .मंत्री डॉ शिंगणे यांनी दिली सदिच्छा भेट

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** माणसाकडे पद प्रतिष्ठा येते आणि जाते मात्र खऱ्या अर्थाने गाव खेड्यातील आपल्या मातीशी व गावातील नागरिकांशी जो घट्ट नाळ जोडून ठेवतो नाते जोपासून ठेवतो तोच खऱ्या अर्थाने नागरिकांच्या मनातील आस्थेचा विषय असतो, अगदी हेच नाते सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आमदार तथा महाराष्ट्राचे माजी मंत्री डॉ . राजेंद्रजी शिंगणे यांनी पदावर असो किंवा नसो जोपासत आले आहे ' दिनांक 19 मार्च रोजी साखरखेर्डा येथे मा .मंत्री डॉ राजेंद्रजी शिंगणे साखरखेर्डा येथे ईदच्या शुभेच्छा देण्याकरता आले होते



, मात्र मज्जिद बाहेर आल्यावर हॉटेल गजेंद्र दिसली व त्यांना श्री शिवाजी व्यायाम शाळेचे संस्थापक अध्यक्ष व हॉटेल गजेंद्र चे मालक स्व . भीमराव काका इंगळे यांची आठवण आली ' स्व . भीमराव काका इंगळे यांच्या हॉटेलमधील पेढा महाराष्ट्र मध्ये प्रसिद्ध आहे अगदी दूर दुरून वरून भाविक हा पेढा नेण्याकरता येत असत , तसेच प्रत्येक सामाजिक कार्यामध्ये स्वर्गीय भीमराव इंगळे यांचा मोलाचा वाटा असायचा ' श्री शिवाजी व्यायाम शाळेच्या माध्यमातून अनेक मल्ल त्यांनी घडवले ' आणि हीच आठवण माजी मंत्री डॉ शिंगणे यांना आले व त्यांनी लगेच आपल्या सहकाऱ्यांना घेऊन हॉटेल गजेंद्र गाठली ' यावेळी स्वर्गीय भीमराव काका इंगळे यांचे सुपुत्र गजानन इंगळे हे यावेळी उपस्थित होते . माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी गजानन इंगळे यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधून स्वर्गीय भीमराव काका इंगळे यांच्या आठवणींना उजाळा दिला . यावेळी गजानन इंगळे यांनी प्रसिद्ध असलेला पेढा दिला , व सर्व माहिती घेतले तसेच नव्याने तयार झालेल्या महत्त्वाच्या सिमेंट रस्त्याची सुद्धा पाहणी केली ' सांगायचं तात्पर्य एवढेच की माजी मंत्री डॉ शिंगणे पंचवीस वर्षे आमदार व जवळपास 11 ते 12 वर्षे मंत्रीपदावर होते , एवढं असताना सुद्धा त्यांचे गावातील नागरिकांशी असलेले नाते आजही कायम आहे आजही ते जुन्या माणसांच्या घरी एवढ्या धावपळीत सुद्धा भेटी देतात , त्यामुळेच खऱ्या अर्थाने माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे खेड्यापाड्यातील मायबाप जनतेचे साहेब आहेत ,

## 'पाणी उशाला अन् कोरड घशाला'; मोहना खुर्दमध्ये ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे हातपंप पडले धूळखात

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मोहना खुर्द :** उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणी टंचाईच्या झळा तीव्र होऊ लागल्या आहेत. मात्र, मोहना खुर्द येथील ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गावातील अनेक हातपंप मागील अनेक महिन्यांपासून नादुरुस्त अवस्थेत आहेत पाणी उशाला आणि कोरड घशाला अशी काहीशी अवस्था ग्रामस्थांची झाली असून, नादुरुस्त हातपंप तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहना खुर्द येथील ग्रामस्थांची तहान भागवण्यासाठी शासनाच्या वतीने विविध भागात हातपंप बसवण्यात आले होते. पूर्वी या हातपंपांवरूनच संपूर्ण गावाला



पाणीपुरवठा होत असे. मात्र, गावात नवीन नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर या हातपंपांकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. देखभाल आणि दुरुस्तीअभावी हे हातपंप आता केवळ शोभेच्या वस्तू बनले आहेत. सध्या ग्रामीण भागात भारनियमनाचा मोठा फटका बसत आहे. ज्यावेळी वीज नसते, अशा वेळी नळ योजना बंद पडते. अशा आणीबाणीच्या प्रसंगी ग्रामस्थांना हातपंपांचाच मोठा आधार असतो. मात्र, ऐन गरजेच्या वेळी हातपंप नादुरुस्त असल्याने महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. ग्रामपंचायतीकडे वारंवार तोंडी तक्रारी करूनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील पाणी टंचाईची गंभीर दखल घेऊन नादुरुस्त असलेले सर्व हातपंप युद्धपातळीवर दुरुस्त करावेत, अशी मागणी मोहना खुर्द येथील नागरिकांनी केली आहे. जर येत्या काही दिवसांत हातपंप सुरू झाले नाहीत, तर ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढण्याचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.

## अर्धवेळ स्त्री परिचरांच्या मानधनात तीन हजारांची वाढ; सीटूच्या दिर्घ लढ्याला यश

भारत संग्राम | प्रतिनिधी

**बुलढाणा :** अर्धवेळ स्त्री परिचारिका ह्या गेल्या काही दशका पासून अर्धवेळ समजल्या जात असल्या तरी संपूर्ण दिवसभर आठ तास जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागात ग्रामीण प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्तरावर अत्यल्प ३ हजार रूपये मासीक मानधनावर काम करतात. सेवेत कायम करून घ्यावे, किमान वेतन, पेंशन, ग्रॅज्युटी, भविष्य निर्वाह निधी आणि सामाजिक सुरक्षा मिळावी म्हणून सीटूच्या नेत्रुत्वात त्यांचा संघर्ष सुरू आहे.विधान सभेच्या पावसाळी अधिवेशना दरम्यान त्यांनी ३ महिन्यांचा दिर्घकाळ चालणारा संप केला.सरकारने मानधन वाढ करतो म्हणून केवळ आश्वासन देऊन संप मागे घेण्यास भाग पाडले.परंतू फेब्रुवारी २०२६ रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट



पक्षाचे राज्य सचिव डॉ अजित नवले यांनी सीटूच्या नेत्रुत्वात राजूरा- लोणी अकोले असा पायी लॉंगमार्च काढून सरकारला मंत्रालयात संघटनेसोबत बैठक घेण्यास भाग पाडले. या बैठकीत आरोग्य मंत्र्यांनी आश्वासन दिल्या प्रमाणे अर्धवेळ स्त्री परिचारिकांच्या मानधनात ३ हजार रूपयांची वाढ करण्याचे जाहीर केले.या तीन हजार रूपयांच्या मानधन वाढीचा शासन निर्णय दिनांक १७ मार्च २०२६ रोजी केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.ह्या शासन निर्णयाची प्रत्येक अंमलबजावणी १ एप्रिल पासून करण्यात येणार आहे.सरकारच्या ह्या निर्णयाचे सीटूच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. लढ्याचा मोठा विजय आहे. या विजयामुळे गेल्या काही दशकांपासून अर्धवेळ स्त्री परिचारिका म्हणून काम करत असलेल्या महिला कर्मचाऱ्यां मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. असे असले तरी कर्मचाऱ्यांचा दर्जा, किमान वेतन पेंशन ग्रॅज्युटी भविष्य निर्वाह निधी आणि सामाजिक सुरक्षा मिळावी यासाठी सीटूचा लढा हा कायम राहील असे मत सीटूचे राज्य अध्यक्ष डॉ डि.एल.कराड. महासचिव एम.एच.शेख , तसेच सीटूचे राज्य सहसचिव तथा बुलडाणा जिल्हा अध्यक्ष कॉ.पंजाबराव गायकवाड, अर्धवेळ स्त्री परिचारिका संघटनेच्या राज्य अध्यक्ष मंगला मेश्राम,कुशीवर्ता मगर, छाया खंडारे, शारदा खंडेराव, इत्यादीनी व्यक्त केले.

# गोमाता,इंद्रायणी चंद्रभागेसह विविध ठराव पारित....

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे

**बुलढाणा :** वारकऱ्यांचा उत्कर्ष आणि ज्वलंत समस्या सोडवण्यासाठी, वारकरी धर्म परिषद वैचारिक प्रबोधनासह,आंदोलन आणि क्रांतीच्या दिशेने वाटचाल करणार आहे. देशाची वर्तमान परिस्थिती पाहता क्रांती शिवाय पर्यायच शिल्लक नाही.असे मत वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष त्यागमूर्ती वासुदेव महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले. १९ मार्चला गुडीपाडव्याच्या पर्वावर नांदुरा तालुक्याअंतर्गत येणाऱ्या त्रिवेणी तट निवासी निंबादेवी संस्थांनच्या भव्य सभा मंडपात वारकरी धर्म परिषदेच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मनोगत व्यक्त करताना वासुदेव महाराज




शास्त्री यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. घाटाखालील जिल्हाध्यक्ष हभप परमेश्वर महाराज घणोकार यांच्या अध्यक्षतेत तर राष्ट्रीय महासचिव प्रबोधनकार अँड. सतीशचंद्र रोठे पाटील, संभाजी महाराज शिर्के, निनाजी महाराज खोडके, रोहित महाराज देवरे, हभप वैष्णवीताई भागवत,हभप आरतीताई आढाव,सचीन महाराज पाटील,अर्चनाताई बावस्कर,सपनाताई मांजरे,हभप. महादेव महाराज,गोविंदा महाराज शिंबरे,कमलाकर व्यवहारे, यांच्यासह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची धर्मपिठावर प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांसह, वारकरी धर्म परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी गोमाता राष्ट्रमाता,ज्वलंत धर्म समस्यांवर प्रबोधनपर विचार व्यक्त केले.

त्रिवेणीतट निवासी आदिशक्ती निंबामाता पूजनाने मेळाव्याला सुरुवात करण्यात आली. यावेळी विदर्भ आणि जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देन्यात आले.वारकरी धर्म परिषदेची संहिता आणि पुढील कार्याची दिशा सर्वांनूमते ठराव पारित करून धर्मपिठावरून राष्ट्रीय महासचिव म्हणून रोठे यांनी जाहीर केली. सामूहिक पसायदानाने मेळाव्याची सांगता करण्यात आली. वारकरी धर्म परिषदेच्या मेळाव्यात महत्त्वपूर्ण ठराव पारीत.. पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना ठरावातील मागण्यांची प्रत सादर करणार: गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा यासाठी शंकराचार्य स्वामी अवमुक्तेश्वरानंद स्वामी यांनी उभारलेल्या राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभाग घेणे. महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांचा निधी वाढविणे, जीर्ण जुन्या मंदिरांचा जिर्नोधार करणे, पंढरपूरच्या वारीतील सहभागी वारकऱ्यांचा सरकारकडून विमा काढणे,इंद्रायणी,भिमा चंद्रभागा स्वच्छता अभियान राबविणे.भजनी मंडळांना दिलेली वयाची अट कमी करणे.माळकरी व्यक्तीलाच वारकरी धर्म परिषदेचे पद देणे.धर्माची सहिंता आणि शिस्तीचे पालन न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे. वार्षिक सभासद नोंदणी शुल्क, या सर्व विविध ठराव धर्मपिठावरून सर्वांनूमते पारित करण्यात आले. शासन प्रशासन स्तरावरील मागण्यांसाठी ठरावांची प्रत पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना वारकरी धर्म परिषदेच्या वतीने सादर करण्यात येणार आहे.

## थोडक्यात



### नगरसूल-तारुर (तळवडे) दरम्यान रेल्वे अंडरब्रिज परिसरात संरक्षणात्मक भिंत बांधण्यास मंजुरी

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रविण पाटील

**नाशिक/येवला :** राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून नगरसूल-तारुर (तळवडे) दरम्यान रेल्वे क्रॉसिंग क्र. १० येथे बांधण्यात आलेल्या रेल्वे अंडरपास (RUB) संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी विद्यमान रस्ता पूर्णपणे द न करता या ठिकाणी RCC रिटेनिंग वॉल (संरक्षणात्मक भिंत) उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे पावसाळ्यात अंडरपासमध्ये माती धसण्याच्या घटना रोखल्या जाणार असून वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होणार आहे. या संदर्भात दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद येथील महाव्यवस्थापकांनी दि. १ डिसेंबर २०२५ रोजी मंत्री छगन भुजबळ यांना पत्राद्वारे माहिती दिली होती. अंडरब्रिजचे काम बहुतांश पूर्ण झाले असले तरी संरक्षण भिंतीचे काम प्रलंबित होते. त्यामुळे पावसाळ्यात मातीचा शिरकाव होऊन वाहतूक खंडित होत होती. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून संरक्षण भिंत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांची सुरक्षितता वाढणार असून वाहतुकीवर कोणताही मोठा परिणाम न होता काम पूर्ण केले जाणार आहे. सदर काम ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. नगरसूल-तारुर (तळवडे) अंडरब्रिज येथे पावसाळ्यात माती रस्त्यावर येत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी मंत्री छगन भुजबळ यांनी रेल्वे विभागाकडे संरक्षण भिंतीचा प्रस्ताव मांडला होता. त्यास मंजुरी मिळाली असून काम ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पावसाळ्यापूर्वी शक्य तितक्या लवकर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील, अशी माहिती समीर भुजबळ यांनी दिली.

### गृह मंत्रालयाचे वाहतूक पोलिसांकरिता कठोर नियम

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ **बुलढाणा :** वाहतूक पोलीस म्हणजे वसुली एजंट नव्हेत! अशा शब्दांत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील वाहतूक विभागाला कडक तंबी दिली आहे. वाहतूक पोलिसांच्या मनमानी कारभाराला आणि वाहनचालकांसोबत होणाऱ्या रोजच्या वादाला पूर्णविराम देण्यासाठी सरकारने आता 'नो बॉडी कॅमेरा, नो चलॅान हे धोरण अत्यंत कठोरपणे लागू करण्याचे आदेश दिले आहेत. यापुढे ज्या पोलिसाच्या छातीवर 'बॉडी बॉर्न कॅमेरा' नसेल, त्याला दंड वसूल करण्याचा कोणताही नैतिक किंवा कायदेशीर अधिकार उरणार नाही. शासनाचे यासंदर्भात काही कडक निर्बंध आणि अटी लावल्या असून त्यामध्ये ड्युटीवर असताना जर पोलिसाकडे कॅमेरा नसेल, तर त्यांनी वाहनचालकाला थांबवून दंडाची पावती फाडू नये, विना-कॅमेरा केलेली कोणतीही दंडात्मक कारवाई बेकायदेशीर मानली जाईल. कॅमेरा बंद ठेवून किंवा तो बाजूला ठेवून कारवाई केल्याचे आढळल्यास, संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई केली जाईल. वाहनचालकाशी बोलताना पोलिसाचा आवाज आणि वर्तन स्पष्टपणे रेकॉर्ड व्हायला हवे. अरेरावी करणाऱ्या किंवा लाचेची मागणी करणाऱ्या पोलिसांची आता गय केली जाणार नाही. केवळ मला दिसलं किंवा तू नियम तोडला असे म्हणून चालणार नाही. कॅमेऱ्यातील रेकॉर्डिंग हाच एकमेव अधिकृत पुरावा मानला जाईल. ५. रस्त्यावर होणारी पैशांची देवाणघेवाण आणि 'सेटलमेंट' थांबवण्यासाठी हा निर्णय म्हणजे पोलिसांच्या मनमानीवर घातलेली वेसण आहे. अनेकदा ट्रॅफिक लपून बसून गाड्या पकडतात किंवा विनाकारण वाहनचालकांना त्रास देतात, अशा तक्रारींचा पाऊस गृहमंत्रालयाकडे पडला होता. यावर फडणवीस यांनी कडक भूमिका घेत स्पष्ट केले की, वाहतूक नियमांची अंमलबजावणी ही शिस्त लावण्यासाठी असावी, सर्वसामान्य जनतेला लुटण्यासाठी नाही.

पारदर्शकता नसेल तर कारवाईला अर्थ नाही. कॅमेरा नसेल तर चालान नाही, हा नियम आता अंतिम आहे. पोलिसांनी शिस्त पाळावी, मगच जनतेकडून अपेक्षे करावी - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, गृहमंत्री. हा नियम पोलिसांसाठी जेवढा कडक आहे, तेवढाच तो तुमच्यासाठीही आहे. जर तुम्ही नियम तोडला असेल आणि पोलिसाकडे कॅमेरा असेल, तर तुमचे हुज्जत घालणे किंवा खोटा आरोप करणे आता कॅमेऱ्यात कैद होईल, ज्यामुळे तुम्हाला दुप्पट दंड किंवा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल असे स्पष्ट केले.

### 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक' संविधानाच्या विरोधात:प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल,

**पुणे :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक 2026 मंजूर केले. हे विधेयक मांडत असताना विरोधकांनी याला जोरदार विरोध केला होता. तसेच हे विधेयक एका समाजाला टार्गेट करत असल्याचा देखील आरोप करण्यात आला होता. आता यावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत टीका केली आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, धार्मिक धर्मांतरांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेले 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, 2026' हे कायदेशीर कसोटीवर टिकणार नाहीये. कारण ते संविधानाच्या तत्त्वांचे उल्लंघन करते. ज्या राज्यांमध्ये अशा प्रकारचा कायदा स्वीकारला गेला आहे, तिथेही त्याला कायदेशीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. गेल्या आठ वर्षांत, नऊ राज्यांनी ज्यापैकी बहुतांश राज्यांमध्ये भाजपचे सरकार आहे,

# राज्यात सवडद येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेची नवोदय परिक्षेत यशाची परंपरा कायम ।

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** खरंतर अतिशय गुणवत्तापूर्वक आणि त्या सुद्धा जिल्हा परिषदेचे शाळा असतील अशी शक्यता कमी असते यावर कोणी विश्वास ठेवणार नाही कारण हाय प्रोफाईल शाळेमधील गुणवत्ता अनेकांना माहीत असते । मात्र या सर्वांना अपवाद आहे बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यातील सवडद येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, या शाळेचे वैशिष्ट्य या गावातील जागृत असणारे पालक आणि आपल्या पाल्यावर नेहमीच अभ्यासावर लक्ष केंद्रित व्हावे म्हणून सहकार्याची भावना असणारे, यामुळे जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सवडद येथील जिल्हा परिषद शाळेचा नवोदय पॅटर्न चांगलाच गाजत



आहे ' दरवर्षी या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी परिश्रम घेतात आणि याचं फळ सुद्धा शाळेला विद्यार्थ्यांना मिळते , दरवर्षी या जिल्हा परिषद शाळेमधून चार-पाच विद्यार्थी हमखास नवोदय परीक्षेमध्ये पास होतात , नवोदय परीक्षेमध्ये आपला मुलगा पास झाला पाहिजे म्हणून अनेक पालक हे विद्यार्थ्यांना शहरांमध्ये नवोदयचे क्लासेस लावतात ' मात्र सवडद येथील जिल्हा परिषद शाळेमधील शिक्षकच विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करतात, २०२५ मध्ये झालेल्या नवोदय परीक्षेमध्ये याही वर्षी चार विद्यार्थी पात्र होऊन त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे ' यामध्ये कुमारी शर्वरी दत्तात्रय पोंधे, ९६ . २५ %, श्रेयस आनंद सुखधाने ९३ . ७५ % ' लोकेश गणेश पडोळे ९८ ७५% '

सुमित मधुकर खरात ९७ . ५०% यांनी घवघवीत यश संपादन केले आहे ' आणि हे विशेष म्हणजे हे सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आहेत , विद्यार्थी घडावेत म्हणून शिक्षकांनी सुद्धा परिश्रम घेतले यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक विष्णू ठोसरे ' शिक्षक प्रभाकर धुळे ' रमेश जैवळ ' अरुण गवई ' सदानंद वानखेडे ' संदीप मांटे ' विठ्ठल काकडे ' दिलीप तुपकर 'या सर्वच शिक्षकांनी नवोदय साठी मुले कसे पात्र होतील याकरता मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली 'तसेच रियाज सय्यद ' संदीप मुंडकुळे ' यांनी सुद्धा मागील वर्षी सप्टेंबर पर्यंत नवोदयची तयारी विद्यार्थ्यांकडून करून घेतली यातील संदीप मुडकुंळे यांची बदली तंदूरवाडी येथे झाली मात्र तरीसुद्धा बदली झाल्यानंतरही त्यांनी अतिरिक्त क्लासेस घेऊन विद्यार्थ्यांना नवोदय साठी घडवले ,आणि या सर्वांमुळे केंद्राचे नाव देखील चांगलेच नावाजलेले आहे ' नवोदय साठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी स्वप्निल निकम , विस्तार अधिकारी माधवराव देशमुख , वि . अ .रंगनाथ गावंडे ,केंद्रप्रमुख संतोष सरकटे ' यांनी सुद्धा नवोदय साठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे ' त्यामुळे संपूर्ण राज्यभरात क्षणासाठी जसा लातूर पॅटर्न ओळखला जातो , तसा राज्यामध्ये आता नवोदय परीक्षेसाठी सवडद पॅटर्न ओळखला जाऊ लागला आहे .

## महाराजस्व समाधान शिबिरात प्रमाणपत्र वितरण

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

**मालेगाव :** शिरपूर जैन येथील कै कोंडबा तात्या ढवळे कनिष्ठ महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमांतर्गत लाभार्थींना विविध प्रकारचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले आहेत शासनाच्या वतीने राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत त्यानुसार शुक्रवार २० मार्च रोजी शिरपूर येथील कै कोंडबा तात्या ढवळे कनिष्ठ महाविद्यालयात जिल्हाधिकारी श्री योगेश कुंभेजकर,उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या मार्गदर्शनात



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या समाधान शिबिराला विभागीय अधिकारी वैशाली देवकर,शिरपूर ग्रामपंचायत प्रशासक सिंधु कांबळे,तहसीलदार दीपक पुंडे,निवासी नायब तहसीलदार रंजना गोरे,नायब तहसीलदार सुनील देशमुख,अरविंद करंगळे गटविकास अधिकारी आर एस कंकाळ,तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली या महाराजस्व समाधान शिबिरात बोलताना उपविभागीय अधिकारी यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली व पाणंद रस्त्यां विषयी उपयुक्त माहिती दिली तहसीलदार दिपक पुंडे यांनी योजनांची माहिती देताना शासन व प्रशासन या बाबत जलदगतीने पुढाकार घेत असल्याचे सांगितले कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना उत्पन्न दाखले,रहिवाशी दाखले,जातीचे प्रमाणपत्र,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र,राशन कार्ड,आधार कार्ड,मतदार कार्ड,सातबारा,वारसा प्रमाणपत्र,फेरफार,८अ,सह इतर महत्त्वाची प्रमाणपत्रे वितरण करण्यात आली आहेत याचा लाभ गरजू लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतला यावेळी विस्तार अधिकारी यादव पळसकर,महसूल मंडळ अधिकारी विजय अवचार, ग्रामपंचायत अधिकारी रवींद्र चौधरी,वनविभागाचे मंगेश वाणी,गजानन शिंदे,दीपक लहाने,कै कोंडबा तात्या ढवळे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंत देशमुख,सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर उल्हामाले,ढोरखेडा येथील सरपंच मिटकरी,पत्रकार गजानन देशमुख,कैलास भालेराव,शंकर वाघ,श्याम वाघ,ग्राम महसूल अधिकारी गणेश गवळी,जी एम लादे,वाघ,सानप,महसूल सेवक किशोर देशमुख,दिलीप कांबळे,यांच्यासह तहसील कार्यालयातील कर्मचारी व शिरपूर मंडळातील तलाठी उपस्थित होते.

## लहान वयात मोठा निर्धार! अदनान रज़ाने पूर्ण केले रमजानचे सर्व रोजे

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** पवित्र रमजान महिन्यात उपवास (रोजे) ठेवणे ही इस्लाम धर्मातील अत्यंत महत्त्वाची परंपरा मानली जाते. यंदाच्या मार्च महिन्यातील कडक उन्हातही सिंदखेड राजा येथील अवघ्या ११ वर्षीय अदनान रज़ा रशीद अंसारी या लहान



मुलाने संपूर्ण रमजान महिन्यातील सर्व रोजे पूर्ण करून एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. अतिशय कमी वयात इतक्या कठीण परिस्थितीत रोजे पाळणे हे खरोखरच कौतुकास्पद असून शहरातील नागरिकांकडून अदनान रजा याचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत उपाशी-पोटी राहूनही त्याने आपल्या धार्मिक कर्तव्याचे काटेकोर पालन केले. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, आजच्या काळात लहान मुलांना उपवास करणे कठीण वाटते, मात्र अदनानने दाखवलेली चिकाटी आणि श्रद्धा ही इतरांसाठी प्रेरणादायी आहे. त्याच्या या यशामुळे कुटुंबियांसह संपूर्ण शहरामध्ये आनंदाचे वातावरण आहे. अदनान रजा यांच्या या कार्यामुळे समाजामध्ये धार्मिक मूल्ये, संयम आणि शिस्त यांचे महत्त्व अधोरेखित झाले असून, सर्व स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## सुलतानपूरमध्ये लवकरच स्टेट बँक ऑफ इंडिया ची शाखा सुरू होणार

भारत संग्राम | प्रतिनिधी

**सुलतानपूर :** सुलतानपूर परिसरातील नागरिकांसाठी लवकरच स्टेट बँक ऑफ इंडियाची (SBI) नवीन शाखा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डॉ.आर. एन. लाहोटी ग्रुप ऑफ कॉलेजेसचे अध्यक्ष संजूभाऊ लाहोटी यांच्या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे.

या संदर्भात संजूभाऊ लाहोटी यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया चे मुख्य प्रबंधक नंदकुमार सिंह यांची भेट घेतली. या भेटीत सुलतानपूरमध्ये बँकेची शाखा सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मुख्य प्रबंधक नंदकुमार




सिंह यांनी सुलतानपूरमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया ,शाखा सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवित लवकरच शाखा उघडण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे प्रत्येक स्थानिक नागरिक, व्यापारी, बचत गट, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना बँकिंग सेवा सहज उपलब्ध होणार असून आर्थिक व्यवहार अधिक सोयीस्कर होणार आहेत. डॉ. आर. एन. लाहोटी ग्रुप ऑफ कॉलेजेसमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना आर्थिक देवाण घेवाण करणे सुद्धा आता सोयीस्कर होणार आहे. परिसरामध्ये नागरिकांसाठी याआधी मेहकर स्टेट बँक ऑफ इंडिया व लोणार स्टेट बँक ऑफ इंडिया या दोन शाखा उपलब्ध होत्या परंतू सुलतानपूरमध्ये शाखा सुरु झाल्यास नागरिकांचा प्रवासाचा त्रास कमी होणार आहे.

सुलतानपूर परिसरात राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू होणे ही दीर्घकाळापासूनची मागणी होती. संजूभाऊ लाहोटी यांच्या पाठपुराव्यामुळे ही मागणी आता पूर्णत्वास जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## स्व. अण्णासाहेब देशमुख यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** सहकारी तत्वावर विदर्भात सर्वात प्रथम दुसरबिड येथे हिंदवी स्वराज्याच्या जननी राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या नावाने "जिजामाता सहकारी साखर कारखाना, दुसरबिड"येथे सन १९७२मध्ये तत्कालीन मेहकर मतदार संघाचे आमदार व बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब देशमुख यांनी जिल्ह्यातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या सहकार्याने भाग भांडवल जमा करून साखर कारखाना सुरू करून जिल्ह्यात हरितक्रांतीची मुहूर्त मेढ रोवून कष्टकरी ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार,छोटे मोठे व्यावसायिक, कर्मचारी व कामगार, यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवून आणले पण दुर्दैवाने दि.१८मार्च



१९७८रोजी अण्णासाहेब देशमुख यांचे अपघाती दु:खत निधन झाले. आज रोजी त्या दुर्दैवी घटनेला ४८वर्षे झाली स्व. अण्णासाहेब देशमुख यांना साखर कारखाना परिसरात असलेल्या पुतळ्याला स्मृतीदिनाच्या निमित्ताने पुष्पहार अर्पण करून उपस्थित ऊस उत्पादक शेतकरी, राजकीय, सहकार,सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, कर्मचारी, कामगार यांनी भावस्पर्शी विनम्र अभिवादन केले.

यावेळी गणेशराव राजे जाधव, मुकुंदराव देशमुख, उत्तमराव देशमुख, प्रभाकर ताठे, डॉ.शिवाजीराव खरात, प्रवीण गीते, विलासराव देशमुख, गजेंद्र देशमुख, दिलीपराव देशमुख,डी. डी. देशमुख, टी. एन. मोगल, एन. ए. डहाळके, एन. व्ही.देशमुख, व्हि. के. जगताप, किसन पिसे, शे. जावेदभाई, उदावंत, तसेच पंचक्रोशीतील ऊस उत्पादक शेतकरी, सामाजिक, राजकीय, सहकार क्षेत्रातील मान्यवर,जिजामाता ग्रीन एनर्जीचे अधिकारी अनंतराव बावणे, भोसले साहेब, सुरक्षा रक्षक, कामगार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# मा.मंत्री डॉ. राजेंद्रजी शिंगणे यांच्या उपस्थितीत शेंदुर्जन येथे रंगणार आध्यात्मिक सोहळा; हनुमंत मूर्ती प्राणप्रतिष्ठा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन !

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** शेंदुर्जन नगरीचे सुपुत्र आणि राज्याचे माजी मंत्री मा. डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली, शेंदुर्जन येथे यावर्षीचा भव्य अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व श्री हनुमंताची मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. वै. ह.भ.प. प्रभाकर महाराज शिंगणे यांच्या पावन कृपाशीर्वादाने आणि ह.भ.प. खुशाल महाराज शिंगणे यांच्या खंबीर



नेतृत्वाखाली हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. भगवान भोलेश्वरच्या पावन भूमीत सोमवार, २३ मार्च २०२६ पासून या भक्तिमय उत्सवाला सुरुवात होत आहे. राजेंद्रजी शिंगणे यांच्या हस्ते होणार मुख्य सोहळा येत्या २ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी या सप्ताहाची सांगता अत्यंत दिमाखदार सोहळ्याने होणार आहे. सकाळी ७:४५ वाजता हनुमंताच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व मंदिर कलशारोहण विधी पार पडेल. या कार्यक्रमाला माजी मंत्री मा. डॉ. राजेंद्रजी शिंगणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, त्यांच्यासोबतच ह.भ.प. प्रकाश बुवा जंजाळ, ह.भ.प. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा: सप्ताहात दररोज पहाटे ४ वाजल्यापासून काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम आणि ज्ञानेश्वरी पारायण होईल. रात्री ८ ते १० या वेळेत राज्यातील दिग्गज कीर्तनकारांची कीर्तने रंगणार आहेत: २३ मार्च: ह.भ.प. रामकृष्ण हाडे गुरुजी (लोणार) २४ मार्च: ह.भ.प. राजू महाराज खराडे (खेडा) २५ मार्च: ह.भ.प. विठ्ठल महाराज बाजड २६ मार्च: ह.भ.प. विश्वनाथ बुवा उगले (रामजन्म) व ह.भ.प. विठ्ठल महाराज देशमुख २७ मार्च: ह.भ.प. डॉ. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर (माळसावरगाव) २८ मार्च: ह.भ.प. शंकर महाराज डोईफोडे (आळंदी) २९ मार्च: ह.भ.प. आत्माराम महाराज शास्त्री ३० मार्च: ह.भ.प. रामदास महाराज सरकटे ३१ मार्च: ह.भ.प. डॉ. यशोधन महाराज साखरे (आळंदी) महाप्रसादाने होणार सांगता गुरुवार, २ एप्रिल रोजी ह.भ.प. १००८ स्वामी हरी चैतन्य महाराज यांच्या शुभहस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत त्यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे आयोजन भोलेश्वर संस्थान, नवयुवक तरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ शेंदुर्जन यांच्या वतीने करण्यात आले आहे. परिसरातील सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्थळ: छत्रपती शिवाजी महाराज मैदान, ग्रामपंचायत समोर, शेंदुर्जन.